**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ४५ वा ● सोमवार ०१ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 45 | Date : 01/07/2024 blow Monday Page 4 Price 4

# सुजाता सौनिक राज्याच्या मुख्य सचिव; प्रशासनात महिलाराज



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महिलावर्गाला खूश करण्यावर भर देणाऱ्या महायुती सरकारने यापूर्वी दोनदा डावललेल्या सुजाता सौनिक यांची राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती केली. त्यांना राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव होण्याचा मान मिळाला असून त्यामुळे आता प्रशासन आणि पोलीस दलात महिलाराज प्रस्थापित झाले आहे. सौनिक यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्याचा आदेश काढल्यानंतर रविवारी सायंकाळी मावळते मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्वीकारली. जून २०२५ पर्यंत म्हणजे बरोबर एक वर्षाचा कालावधी सौनिक यांना मिळणार आहे. १९८७च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असलेल्या सुजाता सौनिक या सर्वांत ज्येष्ठ अधिकारी आहेत.एप्रिल २०२३मध्ये त्यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती अपेक्षित होती. मात्र तेव्हा त्यांच्याच तुकडीतील पण त्यांच्यापेक्षा तुकडीत खालच्या क्रमांकावर असलेले त्यांचे पती मनोज सौनिक यांची वर्णी लागली. त्यांच्या निवृत्तीनंतर १ जानेवारीला नितीन करीर यांना संधी मिळाली. अखेर सुजाता सौनिक यांच्या ज्येष्ठतेचा सरकारने आदर केला. त्यामुळे आता पोलीस महासंचालकपदी रश्मी शुक्ला तर प्रशासनाच्या प्रमुखपदी सौनिक अशा दोन्ही महिला अधिकारी सर्वोच्च पदावर विराजमान झाल्या आहेत. विशेष म्हणजे एकाच कुटुंबातील दोघांना मुख्यसचिवपदी संधी मिळण्याची ही राज्यातील पहिलीच घटना आहे. मुख्य सचिवपदावरून सेवानिवृत्त झालेले नितीन करीर यांची लवकरच 'महारेरा'च्या अध्यक्षपदी वर्णी लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**शेतकरी, महिला तसेच समाजातील विविध घटकांसाठी अनेक योजना मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्या आहेत. त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याला प्राधान्य असेल. प्रशासनाची प्रमुख या नात्याने जास्तीत जास्त चांगले काम करण्याचा प्रयत्न करेन. यासाठी सहकारी आणि लोकप्रतिनिधींचे सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आहे.**

सुजाता सौनिक, मुख्य सचिव

## 'धर्मवीर २' या चित्रपटाचा पोस्टर लाँच कार्यक्रम संपन्न



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी 'धर्मवीर २' या चित्रपटाचा पोस्टर लाँच कार्यक्रम पार पडला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी भूमिका मांडली. या चित्रपटात आनंद दिघे यांची भूमिका प्रसाद ओक याने साकारली. एकनाथ शिंदे लोकांसाठी कसा होता ते क्षितिजने दाखवलं. हा सिनेमा होतोय. गेला सिनेमा २०२२ ला सुपर हिट झाला. आनंद दिघे गेल्यानंतरही त्यांचं काम अजरामर आहे. आनंद मरा नहीं करते. आनंद दिघेंनी अनेकांचं जीवन आनंदीमयी केलं. आनंद दिघेचे फोटो अनेकांच्या घरात आहेत. अनेक कुटुंब, त्यांचं जीवन उद्ध्वस्त होत असताना दिघे यांनी । पान २ वर

## राज्यघटनेवर अढळ विश्वास! 'मन की बात'मध्ये पंतप्रधान मोदी यांच्याकडून मतदारांचे कौतुक

**पंतप्रधान मोदी म्हणाले की**


*** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सुरू केलेल्या 'एक पेड माँ के नाम' नावाच्या वनीकरण उपक्रमाची माहिती पंतप्रधानांनी यावेळी दिली. आपल्या आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ आपण एक वृक्षारोपणही केल्याचे नमूद केले.**

*** केरळमधील अट्टप्पडी येथील आदिवासी महिलांनी बनवलेल्या कर्थुंबी छत्र्यांबाबत पंतप्रधानांनी सांगितले. 'कर्थुंबी छत्र्यांनी केरळमधील एका छोट्या गावातून बहुराष्ट्रीय कंपन्यांपर्यंतचा प्रवास पूर्ण केला आहे. स्थानिक लोकांच्या नवनिर्मितीचे यापेक्षा चांगले उदाहरण काय असू शकते,' असे मोदी म्हणाले.**

*** ऑल इंडिया रेडिओच्या संस्कृत बुलेटिनला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अभिनंदन केले. प्राचीन भाषेने भारतीय ज्ञान आणि विज्ञानाच्या प्रगतीमध्ये मोठी भूमिका बजावली आहे, असे ते म्हणाले.**

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

''जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या देशाच्या नागरिकांनी राज्यघटना आणि लोकशाही प्रक्रियेवर अढळ विश्र्वास ठेवून मतदान केल्याने जनतेचे अभिनंदन करतो.



लोकसभा निवडणुकीत ६५ कोटींहून अधिक नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला'', असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पदभार स्वीकारल्यानंतर आपल्या पहिल्या 'मन की बात'मध्ये सांगितले.

आपल्या ३० मिनिटांच्या नभोवाणी संबोधनात पंतप्रधानांनी अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. त्यांनी जनतेचे आभार मानले आणि निवडणूक आयोग व प्रक्रियेशी संबंधित प्रत्येक व्यक्तीचे अभिनंदन केले. पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भाग घेणाऱ्या भारतीय क्रीडापटूंना पंतप्रधानांनी पाठिंबा दिला. या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी 'चीअर४भारत' हॅशटॅग वापरण्याचे आवाहन जनतेला केले.टोकियो येथील मागील ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी केलेल्या कामगिरीने प्रत्येक नागरिकाची मने जिंकली होती. यंदाही ते यश मिळवतील, अशी आशा पंतप्रधानांनी व्यक्त केली. आमच्या खेळाडूंनी बुद्धिबळ आणि बॅडमिंटनमध्येही गौरवशाली कामगिरी केली आहे. आता आपल्या खेळाडूंनी ऑलिम्पिकमध्येही चांगली कामगिरी करून या खेळांमध्ये पदके जिंकून देशवासीयांची मने जिंकावीत, अशी आशा संपूर्ण देशाला आहे. येत्या काही दिवसांत मला भारतीय संघालाही भेटण्याची संधी मिळणार आहे. मी त्यांना तुमच्या वतीने प्रोत्साहन देईन, असे पंतप्रधान म्हणाले.

## पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने चंद्रभागा वाळवंटात विशेष स्वच्छता मोहीम




**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर शहरामध्ये दिनांक १७ जुलै २०२४ रोजी आषाढी यात्रा भरत असून या आषाढी यात्रेसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भावीक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर मध्ये येत असतात नगरपरिषदेने शहरातील विविध कामे हाती घेतली आहेत

त्यामध्ये लाखो भाविक चंद्रभागाचे स्नानासाठी येत असतात चंद्रभागेच्या स्नान नंतर श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतात या पार्श्र्वभूमीवर दगडी पूल बंधारा ते चंद्रभागा घाटापर्यंत वाळवंटातील विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली असून नदीपात्रा लगत असलेले सर्व घाट व वाळवंट परिसर ७५ कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून स्वच्छ करण्यात आला आहे तसेच वाळवंटामध्ये आठ हाय मास्ट ची दुरुस्ती यात्रेपूर्वी करण्यात आली आहे व वाळवंटा लगत असलेल्या घाटावरचे फ्लड लाईट सुद्धा बसवण्याचे काम चालू आहे तसेच यात्रा कालावधी पूर्ण होईपर्यंत नदीच्या पात्रातील स्वच्छता ठेवण्याचा प्रयत्न नगर परिषद करणार असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी दिली

## पंढरपूर पुरवठा निरीक्षकावर नेमके कुणाचे वरदहस्त? नाईक यांच्या मनमानी कारभाराचे पितळ उघड केस

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

गेल्या अनेक दिवसापासून पंढरपुरातील पुरवठा कार्यालयातील भ्रष्टाचारी कामकाजाची पितळ उघडकीस येऊन सुद्धा प्रसारित करण्यात येत आहे त्यातच त्याच दिवशी बार्शी कार्यालयात लाज लजपत प्रतिबंधक विभागाची कारवाई झाली तरी पंढरपूर तहसील पुरवठा कार्यालयातील पहिले पाढे ५५ या पद्धतीने या कार्यालयातील भ्रष्ट कारभार सोळीत सुरूच आहे

याबाबत खासदार परिधी शिंदे यांच्याकडे स्थानिक ग्रामस्थांनी तक्रार केली यानंतर खासदारपणे ती शिंदे यांनी संबंधित पुरवठा निरीक्षक यांना धारेवर धरत चांगलीच कान उघडली केली पंढरपूरची पुरवठा निरीक्षक हे वारंवार रेशन दुकानदारांवर अन्याय करतच आहेत

वारंवार रेशन दुकानदारांना भेटीत धरून सातत्याने अन्याय करतच आहेत या अन्याय विरोधात स्थानिक पातळीवर जिल्हा संघटक घालून उठाव केला जातोय लेखी तक्रारी देव देऊन सुद्धा संबंधित पुरवठा निरीक्षकावर वरिष्ठ स्तरावरून कोणतीच कारवाई केली जात नाही पुरवठा निरीक्षक नेमके कोणाचे व्रत आहे नेमके अनधिकृत व्यवहारांना या पाठीशी घालत जाते का बार्शी पुरवठा लाच प्रकरणी पुन्हा अशा प्रकार घडून ये म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सर्वत्र ऑपरेटरचे लॉगिन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी खडक कारवाई करत बंदच केले मात्र इकडे पंढरपूर पुरवठा निरीक्षकाच्या मनमानी कारभार जोमात सुरूच आहे कारवाईबाबत वरिष्ठ अधिकारी यांच्याशी का भूमिका घेता येत यावर ग्रामस्थ प्रश्र्नचिन्ह उपस्थित करताहेत दुसरीकडे संधी साधून पुरवठा निरीक्षक राजकीय दबाव तंत्राचा वापर करण्यासाठी नेते मंडळीकडे सारखे फेऱ्या मारताना प्रथम दर्शी दिसूनही येतायेत या राजकीय मंडळींना गोंधळात आणण्याची कारस्थान सुसाट वेगाने सुरू याबाबत जिल्हा संघटनेच्या जिल्हा प्रमुखांना घेतलेल्या माहितीच्या आधारे एखादं कार्ड धारकाने कार्डावर धान्य घेतल्यानंतर त्या तो लाभार्थी पात्र असल्याने त्याला शासनाच्या नियमानुसार शासनाची कुठल्याही योजने पासून वंचित ठेवता येत नाही त्यामुळे जिल्हा संघटनेच्या वतीने कार्ड धारक लाभार्थ्यांना आव्हान करण्यात येते की धान्य बंद होईल या फोन बळी पडू नये एक प्रकारे तो दिशाभूल करण्याचे कट कारस्थान आहे असे जाहीर आव्हान जिल्हा संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे

## नवीन फौजदारी कायद्यांमुळे न्यायव्यवस्थेतील अनुशेष कमी होण्यास मदत होईल : राज्यपाल




**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :**

वसाहतवादी ब्रिटिश सरकारने भारतातील प्रदीर्घ आणि शोषणात्मक राजवटीत स्वतःच्या फायद्यासाठी अनेक कायदे केले. मात्र आता स्वातंत्र्याच्या अमृत काळात पारित केलेल्या नवीन फौजदारी कायद्यांमुळे न्यायप्रक्रियेची कार्यक्षमता वाढवण्यास तसेच न्यायव्यवस्थेतील अनुशेष कमी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी येथे केले.

'फौजदारी कायद्यातील सुधारणा २०२३' या विषयावर केंद्रीय विधी व न्याय मंत्रालयातर्फे आयोजित एक दिवसाच्या चर्चासत्राचा समारोप राज्यपाल बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत एनएससीआय सभागृह, मुंबई येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते.

समारोप सत्राला छत्तीसगड उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती रमेश सिन्हा, । पान २ वर

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत 'आरोग्यवारी अभियाना'चा शुभारंभ

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

एका बाजूला ज्ञानोबा- तुकारामाचा जयघोष तसेच टाळ मृदुंगाचा गजर करत असताना वारीत चालत असणाऱ्या महिला वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही जबाबदारी राज्य महिला आयोगाकडून चांगल्याप्रकारे पार पाडली जात आहे, असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या 'आरोग्यवारी अभियाना'च्या उद्घाटन कार्यक्रमात केले.

भवानी पेठेतील निवडुंगा विठोबा मंदिर येथे राज्य महिला आयोगामार्फत पुणे महानगरपालिकेच्या सहाय्याने आयोजित या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमास आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर, सचिव माया पाटोळे, राजलक्ष्मी भोसले, दीपक मानकर, हेमंत रासने, लक्ष्मी आंदेकर आदी उपस्थित होते.

वारकरी महिलांचे आरोग्य, सुरक्षितता, स्वच्छता आदींच्या अनुषंगाने हा उपक्रम चांगला असल्याचे सांगून मंत्री कु. तटकरे म्हणाल्या, वारीमध्ये वृद्ध, मुली, गरोदर स्त्रिया तसेच स्तनदा माता अशा सर्व स्तरातील महिला अनेक दिवसांसाठी घरापासून दूर असतात. अशा वेळी सॅनिटरी नॅपकीन वाटपासारखा कौतुकास्पद उपक्रम राबविताना त्यांची धार्मिक, अध्यात्मिक परंपरा जपण्यासह आरोग्याची काळजी घेण्यासाठी आयोगाने घेतलेला पुढाकार स्तुत्य आहे. या वारीदरम्यान आयोगाकडून २५० पेक्षा जास्त आरोग्य केंद्रे वारकरी महिलांसाठी । पान २ वर



## संपादकीय

### परिपक्वता आणि वैचारिक वारसा

तब्बल दहा वर्षांनंतर विरोधी पक्ष नेता मिळाला आहे. राहुल दोन दशकांपासून संसदीय राजकारणात आहेत. ते सलगपणे लोकसभेचे सदस्य म्हणून या काळात निवडून आले आहेत. यातील निम्मा काळ त्यांच्या पक्षाचे सरकार केंद्रात होते. गांधी घराण्याचे वलय पाहता राहुल तेव्हा पंतप्रधानही होऊ शकले असते. मात्र, त्यांनी एक खासदार म्हणून राहणे आणि पक्षसंघटनेत काम करण्याला पसंती दिली. आता त्यांनी विरोधी पक्षनेतेपद स्वीकारून घटनात्मक जबाबदारी स्वीकारली आहे. नवी जबाबदारी सांभाळताना त्यांना अनेक आव्हाने पेलावी लागणार आहेत. त्यात प्रामुख्याने स्वपक्षीयांना आणि उत्साही मित्रपक्षांनाही आवर घालावा लागणार आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल खरेतर अत्यंत चोख न्याय देणारा ठरला. भाजपला डोक्यावरचा सूर्य मावळणारच नाही अशी दर्पोक्ती होती. दोन टर्म पूर्ण बहुमताने त्यांचे सरकार होते. कोणाच्या कुबड्यांची त्यांना आवश्यकता भासली नाही आणि कोणाला विनंत्या-आर्जवही करावे लागले नाहीत. त्यांना वाटले ते निर्णय त्यांच्या सरकारने धडाडीने घेतले. वास्तविक लोकशाहीत सगळ्यांशी म्हणजे त्यात विरोधकही आले, सल्लामसलत करून पुढे जायचे असते. ती प्रक्रिया गेल्या दशकात थांबली. त्याला कारण विरोधी पक्ष क्षीण झाला होता. सभागृहात कोणी नेताच नव्हता आणि जे होते ते शक्तीपात झालेले गट होते. ही निश्चितच आदर्श स्थिती नव्हती. जेव्हा अशी स्थिती उद्भवते तेव्हा सरकार निरंकुश होण्याची शक्यता अधिक असते. त्यातून काही चुकीचे निर्णय घेतले जातात आणि त्याचे परिणाम सगळ्यांनाच भोगावे लागतात. त्या न्यायाने विचार करता यावेळेचा जनादेश सगळ्यांना स्थिर करणारा आहे. अनेक महत्त्वाच्या समित्यांच्या आणि संस्थांच्या प्रमुखांच्या नियुक्त्यांमध्ये विरोधी पक्ष नेत्याचा सहभाग असतो. त्यावेळी अनावश्यक कटुता संघर्षाला चालना देणारीच ठरेल व विरोधी पक्षनेत्याच्या समावेशाच्या मूळ हेतूलाच त्यामुळे हरताळ फासला जाईल. एकदा जनतेने कौल दिला की निवडणुकीतील कटुता मागे ठेवत सामोपचाराने काम करण्याची अपेक्षा केली जाते. परस्परांवर चिखलफेक झाली आहे. त्याचे डाग मनातून पुसून टाकावे लागतील. सरकार आणि विरोधक यांचे विश्वासाचे, आदराचे नाते निर्माण करावे लागेल. राजकीय मतभेद बाजूला ठेवून देशाचा व्यापक विचार करून निर्णय घ्यावे लागतात आणि तसे वागावेही लागते. राहुल यांच्याकडे तेवढा अनुभव, परिपक्वता आणि वैचारिक वारसा आहे. तो जपत त्यांना वाटचाल करावी लागणार आहे.

# फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात भारताचा प्रगतीशील मार्ग या विषयावरील परिषदेचा मुंबई येथे शुभारंभ

## फौजदारी न्याय प्रक्रियेत भारत पथदर्शी ठरेल : केंद्रीय विधी व न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज** देशात तीन नवीन फौजदारी कायदे १ जुलै २०२४ पासून लागू होत असून, या कायद्यांमुळे प्रत्येक नागरिकास न्याय मिळण्यासाठी सुलभता होईल, तसेच फौजदारी न्याय प्रक्रियेत भारत आगामी काळात पथदर्शी ठरेल असा विश्र्वास केंद्रीय कायदा व न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी व्यक्त केला.

भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय साक्ष अधिनियम, २०२३, आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ हे तीन नवीन फौजदारी कायदे १ जुलै,२०२४ पासून लागू होतील. यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी केंद्र सरकारचे विधी व न्याय मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने मुंबईतील एन.एस.सी.आय. ऑडीटोरियम येथे फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात भारताचा प्रगतीशील मार्ग या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी श्री.मेघवाल बोलत होते.या परिषदेस मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, राजस्थान उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती मनिंद्र मोहन श्रीवास्तव, पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती गुरुमित सिंग संधावालिया, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती चंद्रकांत वसंत भडंग, विधी व न्याय मंत्रालयाचे सचिव डॉ.राजीव मनी, विधी व न्याय मंत्रालयांच्या अतिरिक्त सचिव डॉ.अंजू राठी राणा, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर तसेच विविध राज्यातील उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, पोलिस, केंद्रिय तसेच राज्य विधी अधिकारी, प्रबंधक, विधी शाखेचे अभ्यासक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री श्री.मेघवाल म्हणाले की, शिक्षेवर भर देणाऱ्या वसाहतवादी प्रवृत्तीतून दंड संहिता तयार झाली. मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय नागरिकांना न्याय देण्याच्या भूमिकेतून भारतीय न्याय संहिता लागू होत आहे.



आजच्या युगात तंत्रज्ञानात मोठे बदल झाले आहे, त्यामुळे कायद्यातही सुधारणा करणे आवश्यक असल्याचे श्री.मेघवाल यांनी सांगितले.या नवीन तीन कायद्यांबद्दल केंद्रीय राज्यमंत्री श्री.मेघवाल म्हणाले की, भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता सुधारणा करण्यासाठी संसदीय स्थायी समिती, विविध राज्यांची मते, खासदार, आमदार त्याचबरोबर सामान्य नागरिकांकडूनही सूचना मागविण्यात आल्या. मागणीनंतर हे विधेयक विचारविनिमय समितीकडे सुद्धा पाठविण्यात आले. यासाठी नवी दिल्ली येथे पहिली परिषद घेण्यात आली. त्याचबरोबर गृह मंत्रालयासोबत ५८ बैठकाही घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

श्री.मेघवाल म्हणाले की, यातील तांत्रिक मुद्दे भक्कम आहेत. याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी देशातील १६ हजार पोलीस स्टेशन्स सी.सी.टी.एन.एस. या प्रणालीशी जोडले गेले आहे. या कायद्यात मॉब लिंचींग, संघटित गुन्हेगारी, आर्थिक गुन्हेगारी, कम्युनिटी सर्व्हिस त्याचप्रमाणे झिरो एफ.आय.आर. आदीबाबत विचार केला गेला आहे. न्याय प्रक्रिया जलद गतीने होण्यासाठीही विशेष व्यवस्था करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षांचा अमृतकाळ देश अनुभवत असून हे नवीन कायदे पथदर्शी ठरतील असेही श्री.मेघवाल यांनी सांगितले.या परिषदेस माजी मुख्य न्यायमूर्ती श्री.भडंग, मुख्य न्यायमूर्ती श्री.संधावालिया, मुख्य न्यायमूर्ती श्री.श्रीवास्तव, मुख्य न्यायमूर्ती श्री.उपाध्याय यांनीही या कायद्यांबाबत आपले विचार व्यक्त केले.

विधी व न्याय मंत्रालयाचे सचिव डॉ.मनी यांनी प्रास्ताविक केले. या परिषदेच्या उत्तम नियोजनाचे काम विधी व न्याय मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव डॉ.अंजू राठी राणा आणि महाराष्ट्र शासनाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केले.

पान १ वरुन

### केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ ..

उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचेही त्या म्हणाल्या.

कु. तटकरे पुढे म्हणाल्या, यंदाच्या राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात महिलांना सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू करण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी ४ हजार ६०० कोटींची तरतूद केली आहे. अडीच लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपये डीबीटीद्वारे थेट देण्यात येणार आहेत. या योजनेची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने मोबाईल प किंवा गावातील महा-ई सेवा केंद्रे आदी तसेच शहरातील सेतू आदींच्या माध्यमातून १ जुलैपासून करता येणार आहे. पहिल्या टप्प्यात १५ जुलैपर्यंत नोंदणी झालेल्यांची छाननी करुन १६ तारखेपासून लाभ देण्यात येणार आहे.

लेक लाडकी योजना, घरटी ३ गॅस सिलेंडर देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना, महिला बचत गटांना खेळते भांडवल, प्रत्येक आरोग्य केंद्रात स्तन व गर्भाशयाच्या कर्करोग तपासणीची सुविधेसाठी आरोग्य साधने व उपकरणे, कुटुंबाचे ८ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्गातील तसेच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थीनींच्या उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काचा संपूर्ण परतावा अशा अनेक योजनांची तरतूद केली आहे.

पुण्यासह १७ शहरात पहिल्या टप्प्यात महिलांना १९ हजार ई- पिंक रिक्षा देण्यात येणार असून एकट्या पुणे शहरात १ हजार ई- पिंक रिक्षा देण्यात येणार आहेत. पुढील काळात उबेर, ओलासारख्या व्यासपीठाशी या रिक्षांची जोडणीसाठी प्रयत्न करण्यात येणार असून महिलांनी प्रवासासाठी नोंदणी केल्यास त्यांना महिला चालक असलेल्या ई- पिंक रिक्षातून प्रवास करता येणार आहे.

प्रत्येक वारकरी दिंडीला २० हजार रुपये देण्याचा तसेच वारीचा समावेश जागतिक वारशामध्ये व्हावा यासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे श्री. मोहोळ यांच्या माध्यमातून पाठपुरावा व्हावा अशी विनंतीदेखील त्यांनी केली.

आरोग्यवारी अभियानातील सातत्य कौतुकास्पद- केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

केंद्रीय राज्यमंत्री श्री. मोहोळ म्हणाले, वारीमध्ये महिला प्रवास करत असताना आरोग्याच्या अनेक समस्या होत असतात. अशा प्रसंगी त्यांची काळजी घेणे, आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी त्या त्या ठिकाणच्या स्थानिक प्रशासनाच्या सहाय्याने आयोगामार्फत गेली तीन वर्षे हा उपक्रम सातत्य ठेऊन राबविण्यात येत आहे हे कौतुकास्पद आहे. महिला या आधार, न्यायासाठी महिला आयोगाकडे पाहत असतात. कौटुंबिक हिंसाचार रोखणे, महिला अत्याचाराचे प्रश्र्न, सुरक्षिततेचे उपक्रम, विधवा पुनर्विवाह अशा अनेक बाबींमध्ये आयोगाकडून चांगले काम केले जात आहे. महिलांसाठी एक टोल फ्री नंबर उपलब्ध करून देऊन त्यावर कधीही संपर्क साधून समस्या, अडचणी मांडण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे महिलांची सुरक्षिततेची महाराष्ट्राची संस्कृती जपली जात आहे. राज्य शासनाने मांडलेल्या अर्थसंकल्पात प्रत्येक क्षेत्राला न्याय देण्याचा प्रयत्न झाला आहे, असेही श्री. मोहोळ म्हणाले.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या, गेल्या तीन वर्षापासून आरोग्यवारी अभियान राबविण्यात येत आहे. महिलांसाठी प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी स्थापन कक्षामध्ये स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष, वृद्ध महिलांसाठी विसावा कक्ष, सॅनिटरी नॅपकिन वेंडिग, तसेच बर्निंग मशीन, तसेच महिला डॉक्टर अशी व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक १ ते दीड किलोमीटर अंतरावर सॅनिटरी नॅपकिन वेंडिग, तसेच बर्निंग मशीनची व्यवस्था करण्यात आली आहे. महिलांच्या आरोग्यासोबत त्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी स्थापन '१०९१' टोल फ्री क्रमांकाची माहिती व्हावी म्हणून एलईडी व्हॅन, तसेच दर्शनी भागात लावण्याची व्यवस्था केली आहे, असे सांगून त्यांनी महिला आयोगाच्या कामकाजाची माहिती दिली.

प्रारंभी कु. तटकरे यांच्या हस्ते आरोग्यवारी अभियान आणि महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. या कक्षात हिरकणी कक्ष, महिलांसाठी नॅपकिन वेंडिंग मशीन आदींचे उद्घाटन करण्यात आले.कार्यक्रमाला पुणे महानगर पालिकेच्या आरोग्य अधिकारी कल्पना बळीवंत, उपायुक्त संदिप कदम, अविनाश सपकाळ, क्षेत्रीय अधिकारी अस्मिता तांबे आदींसह मनपा स्वच्छ उपक्रमातील महिला कर्मचारी तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### नवीन फौजदारी कायद्यांमुळे

गुजरात उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती सुनीता अगरवाल, जम्मू आणि काश्मीर व लद्दाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती एन कोटीस्वर सिंह, केंद्रीय विधी आयोगाच्या सदस्य सचिव डॉ रिटा वशिष्ठ, विधी कार्य विभागाचे सचिव डॉ राजीव मणी, विभागाच्या अतिरिक्त सचिव डॉ. अंजू राठी राणा, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, अधीनस्थ न्यायालयांचे न्यायाधीश, अधिवक्ता, शिक्षणतज्ज्ञ, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी तसेच विधी शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.जुने कायदे बदलताना कायदा राबविणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची मानसिकता बदलणे देखील गरजेचे आहे, असे नमूद करून शासकीय कार्यालये, न्यायालये, तहसीलदार कार्यालये येथे जनसामान्यांप्रती सहकाराची मानसिकता दिसून येते, असे राज्यपालांनी सांगितले. अन्य काही कायद्यांमध्ये देखील सुधारणा केल्याजातील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.महाराष्ट्रातील विद्यापीठांचा कुलगुरु या नात्याने आपण कुलगुरूंना नवीन फौजदारी कायद्यांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्यास सूचना देऊ असे राज्यपालांनी सांगितले.

### 'धर्मवीर २' या चित्रपटाचा पोस्टर

त्यांचं जीवन वाचवलं. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या सरकारशी आम्ही तडजोड करणार नाही, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

धर्मवीर २ या चित्रपटाच्या पोस्टर लाँचसाठी अलेल्यांचं मी स्वागत करतो. मी धर्मवीर २ या चित्रपटाला शुभेच्छा देतो. धर्मवीर आनंद दिघे हे माझे गुरू होते. त्यांच्या सावलीत मी वाटचाल सुरू केली आणि राजकारण तसेच समाजकारण शिकलो. त्यांनी हृदयावर स्थान निर्माण केले होते. आनंद दिघे हे पंचाक्षरी मंत्र होते. कुणाचेही काम असूद्या ते पूर्ण होत होते. सगळीकडे हरल्यावर माणूस तिथे पोहचत होता. कार्यकर्ते म्हणून आम्हाला आनंद होता. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा सुद्धा आम्ही शब्द पूर्ण करत होतो. आम्ही त्यांचा संघर्ष पाहिला आहे . त्यांचे बँकेत खातं सुद्धा नव्हतं. असे व्यक्तिमत्व राज्यात कानाकोपऱ्यात लोकप्रिय झाले, अशी भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.कुठलीही सत्ता नसताना जनतेच्या प्रत्येक पावलोपावली आनंद दिघे यांची आठवण येते. त्यांचे शब्द आजही कानावर पडल्यासारखं वाटतं. मी स्वत:ला मुख्यमंत्री नाही, तर राज्याचा सेवक समजतो. लोकांचे काम करतो. बाळासाहेब ठाकरे यांचे सुद्धा आशीर्वाद होते, असं मुख्यमंत्री म्हणाले.

पहिला सिनेमा काढल्यावर लोक म्हणत होते पुढे काय? आगे आगे देखो क्या असे म्हणालो. त्यांनी संघर्ष केला आहे. सर्वसामान्य माणसाला न्याय देण्यासाठी टोकाचा निर्णय घेत होते. लोकांच्या मागणीनुसार धर्मवीर पार्ट २ आला आहे. प्रसाद ओक यांना मी धन्यवाद देतो. त्यांनी आनंद दिघे साहेब यांना पाहिलं नव्हतं. त्यांची माहिती घेऊन त्यांनी त्यांची भूमिका साकारली, असं एकनाथ शिंदेंनी सांगितलं. आताचा एकनाथ शिंदे आणि पूर्वीचा एकनाथ शिंदे हा लोकांसाठी काय करत होता, हे या चित्रपटात दाखवले आहे. आनंद मरते नहीं. आनंद मरा नहीं करते. सत्य घटनेवर हा चित्रपट आधारित आहे. हो पण सगळं खरं दाखऊ शकत नाही, असं एकनाथ शिंदे मिश्किलपणे म्हणाले.


### निर्गवी निर्मळ मनाचा माजी सैनिक सुरेश सुरवसे साहेब सराटीकर


तुळजापूर तालुक्यातील मौजे सराटी येथील आंबेडकरी चळवळीतील स्वाभिमानी निष्ठावंत जेष्ठ कार्यकर्ते कालकथीत हरीबा सुरवसे यांचे सुपुत्र आयुष्यमान सुरेश हरीबा सुरवसे यांचा जन्म दि.३० जून १९६३ रोजी सराटी येते झाला.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सराटी येते त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले.जवाहर विद्यालय अणदूर ता.तुळजापूर येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण करून त्यांनी सोलापूर येथील दयानंद महाविद्यालयात उच्च शिक्षण घेऊन वाणिज्य शाखेत बि.कॉम.ही पदवी संपादन करून बॉम्बे इंजिनिअर ग्रुप मध्ये आर्मी सैन्य दलात भरती झाले.अत्यंत प्रामाणिक धाडसी सैनिक म्हणून त्यांनी सैन्या दलात आपली वेगळी ओळख निर्माण केली.आर्मी दलात असताना कारगील युद्धाबरोबरच अनेक युद्धाच्या मोहीमेत सहभागी झाले.आर्मी सैन्य दलातून सेवावृत्त झाल्यावर भारत सरकारच्या सेनादलातच पुनश्र्च नोकरी पत्करली आणि सेवाजेष्ठते नुसार निष्कलंक प्रमाणिक पणे सेवा करून ते सेवा निवृत्त झाले.दरम्याच्या काळात आपले कुटुंब सांभाळत मुलांना उच्च शिक्षित केले.आई वडील भाऊ बहीण यांच्या बाबतीत आपली कौटुंबिक



जबाबदारी संपूर्णपणे पार पडली पाडत आहेत.संध्या ते पुणे येथे स्थायिक झालेले आहेत.परंतु त्यांनी गावाकडची नाळ तुटूनये म्हणून त्यांनी गावाकडच्या शेती मध्ये आपल्या इंजिनिअर मुलाच्या संकल्पनेतून जवळपास दोन हजार केसरी आंबा फळ झाडांची इस्राएल पध्दतीने लागवड केली असून आज त्याचे आंबे परदेशी विक्री साठी पाठविले जातात. त्यामुळे ते प्रत्येक आठ पंधरा दिवसाला गावाकडे येतात.एकंदरीत त्यांची परिस्थिती समाधानकारक पुढालेली असताना देखील ते अत्यंत निर्गवी मनमिळावू सर्वांसी जुळवून घेत आपले जीवन आनंदमयरित्या व्यतीत करतात.आज त्यांचा ६१वा वाढदिवस आहे.त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

**-एस.के.गायकवाड, वागदरी ता.तुळजापूर**




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# डुबेरे विद्यालयात स्वच्छतागृहाचे उद्घाटन




**सिन्नर/दैनिक यशसिध्दि न्यूज :** डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रसाधनगृह व स्वच्छता गृहाचे उदघाटन शालेय समितीचे अध्यक्ष तथा पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष नारायणशेठ वाजे यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने,काशिनाथ वाजे,रोटरी क्लबचे अध्यक्ष ग्यानेश वर्मा,सचिव दिलीप दिघे,ग्लोबल ग्रँड चेअरमन फिरदोस कपडिया,कर्नल सहाणे,वर्षा जोशी,विवेक देशपांडे, सौमित्री दास,कुणाल शर्मा,शंकर पाटील, महेश थुबे आदी मान्यवर उपस्थित होते.विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले.रोटरी क्लब नाशिकरोड यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी यापूर्वी प्रसाधन गृह बांधून देण्यात आले होते. कालांतराने या प्रसाधनगृहाचे दरवाजे खराब झाले होते. हे सर्व दरवाजे रोटरी क्लब नाशिकरोड यांच्याकडून नवीन बसवण्यात आले आहे. तसेच रंगरंगोटी देखील करण्यात आली. चारी बाजूने संरक्षक जाळी बसवण्यात आली असून पाण्याची टाकी देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे सर्व सामाजिक बांधिलकी ठेवून करण्यात आले आहे .रोटरीक्लब हे नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवित असते. विद्यालयातील उपक्रमशील विज्ञान शिक्षक पी.आर.करपे यांच्या माध्यमातून प्रसाधनगृहे बांधकाम व नूतनीकरण करण्यात महत्त्वाचा वाटा आहे.

नाशिक रोड रोटरी क्लबचे मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस एडवोकेट नितीनजी ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत,शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, शालेय समितीचे अध्यक्ष नारायण शेठ वाजे, उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक रामदास वाजे आदींसह शालेय समितीचे सदस्य, पालक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे. सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.यावेळी डी. एच.जाधव, सोमनाथ पगार,प्राध्यापक रामदास वारुंगसे,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# नगरपरिषद प्रस्तावित बुद्धभूमीवर विस्तार अधिकाऱ्यांनी केले आसान व्यवस्था दान

## पंढरपूरकर पेरणा घेतील: माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसाट यांचे प्रतिपाद



**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज** बोधिस्तव पांडुरंगाच्या पंढरी नगरीचे सांस्कृतिक व आध्यात्मिक वैभव संपन्न करणाऱ्या तथा मायोथेरोप बंधात ज्ञानज्योती यांनी नामकरण केलेल्या आणि त्यांच्या भिकू संघाने अनुमोदन दिलेल्या. पंढरपूर नगरपरिषद प्रस्तावित महात्म्य आरक्षित बुद्धभूमी येथे येणाऱ्या धाम सरदाळूंना बसवण्यासाठी शासन व्यवस्था दिवंगत वैभव अशोक प्रक्षाळे यांच्या स्मृती पित्यर्थ व त्यांच्या कुटुंबीयांकडून भारत भूषण संघ पंढरपूर आणि सर्व धम्म श्रद्धा यांच्या उपस्थितीत भारत भूषण संघाचे प्रमुख भगवानराव भोसले यांच्या हस्ते पंढरपूर नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष मा. आणि सम्यक क्रांती मंचाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. प्रशांत लोंढे आणि पंढरपूर नगरपरिषद कर्मचारी संघटक इंटक चे उपाध्यक्ष संतोष सर्व गोळे यांच्याकडे लोकार्पण करण्यात आले

यांप्रसंगी भारत सरकारचे सामाजिक न्याय मंत्री मा. रामदासजी आठवले साहेब यांच्या हस्ते ओपन केलेल्या महाबोधी वृक्षांचा वारसा सांगणाऱ्या बौद्धिक वृक्षास जलसिंचन तसेच आसामतात डौलाने फडकत असलेल्या ध्वजास भारत भूषण संघाद्वारे वंदन करण्यात आले

तसेच विश्र्वदीप भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रथमेश पंचांग प्रणाम करून सामूहिक बुद्ध वंदना करण्यात आली याप्रसंगी संमत क्रांती मंचाचे संस्थापक सिद्धार्थ जाधव महासचिव स्वप्नील गायकवाड सोलापूर जिल्हा अध्यक्ष अक्षय सोनवणे कार्यकांनी सदस्य दीपक महाराज वाघमारे निलेश सोनवणे इत्यादी मान्यवरांची सहभाग नो होऊन आयु अशोक प्रचार आणि त्यांच्या कुटुंबीयांकडून लोकप्रिय केलेल्या धम्मदानास अनुमोदन दिले या दान लोकार्पण सोहळ्यात धम्मविधी बौद्धाचार्य आर वाय सुरवसे यांनी पार पाडला याप्रसंगी समाजातील सर्व घरातील महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या

# भारत सरकारच्या सीबीसी दिल्ली ड्रामा डिव्हिजनला शाहीर सुभाष गोरे यांचे कलापथक महाराष्ट्रातून उत्तीर्ण

## सोलापूर जिल्ह्यातून कला पथकावर अभिनंदनाचा वर्षाव



**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज** भारत सरकारच्या माहिती व जनसंपर्क सूचना प्रसारण मंत्रालय संलग्न सीबीएस ड्रामा डिव्हिजन दिल्ली विभागीय कार्यालय पुणे पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन येथे दिनांक २७ जून २०२४ रोजी महाराष्ट्रातून घेण्यात आलेल्या लोक कलावंत कला पथकाचे स्पर्धात्मक ऑडिशन मध्ये जवळा ता. सांगोला जि. सोलापूर शाहीर सुभाष गोरे यांच्या जय भवानी कलापथक सांस्कृतिक मंडळ जवळा संचातील १५ कलावंतांनी निवड चाचणीसाठी सहभाग घेतला होता. यामध्ये शाहीर सुभाष गोरे (प्रमुख) विक्रम गोरे, प्रताप गोरे, खंडू भिसे, वैभव ऐवळे, उत्तम गळवे, सोमनाथ साठे, ओंकार सकट, अंकुश लांडगे, भिवा भोसले, श्रीखंड होळकर, वनिता भोसले, वर्षा केंगार, केराबाई पिसे, राणी करडे या १५ कलावंतांनी सहभाग घेतला होता. या कलावंतासह जय भवानी कला पथकाची निवड भारत सरकारचे दिल्ली ड्रामा डिव्हिजनचे कलावंत म्हणून महाराष्ट्रातून निवड झालेली आहे.


या कला पथकाला कलावंतांना मार्गदर्शन सहकार्य प्राध्यापक श्री बबनराव गायकवाड (सर) सांगोला महाविद्यालय सांगोला प्राचार्य श्री बाळासाहेब शिंदे (सर) कै सौ वत्सलादेवी देसाई विद्यालय अण्णासाहेब घुले सरकार जुनिअर कॉलेज जवळा यांचे सहकार्य लाभले . मा.आमदार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे पाटील यांनी कलापथकाचे व कलावंतांचे अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. या यशानंतर सोलापूर जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव कलावंतांना होत आहे.

# बी.सी.ए.प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरूवात

## कासेगावच्या इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट स्टडीज (आय.सी.एम.एस) मध्ये मोफत सुविधा उपलब्ध

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज** 'कासेगाव (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल इन्स्टिटयूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संचलित इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट स्टडीज या महाविद्यालयामध्ये बी.सी.ए प्रथम वर्ष प्रवेशासाठी सीईटीच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरूवात झालेली आहे. सदर ऑनलाईन प्रक्रिया ही शनिवार, दि.२९ जून, २०२४ पासून बुधवार, दि.३ जुलै, २०२४ पर्यंत चालणार आहे.' अशी माहिती महाविद्यालयाच्या कॅम्पस प्रमुख डॉ.जयश्री भोसले यांनी दिली.

सन २०२४-२५ करीता बी.सी.ए. प्रथम वर्ष या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी सीईटी परीक्षा देणे आवश्यक आहे. सदर सीईटी परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरूवात झालेली आहे. पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांना बी.सी.ए. प्रथम वर्ष प्रवेशाच्या अनुषंगाने




सीईटी साठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया मार्गदर्शन, पालकांचा होणारा संभ्रम, संबंधीत कागदपत्रे जमविताना होणारी अडचण व शंका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा केंद्र सुरु केले असून यंदाचे हे बी.सी.ए. चे १६ वे वर्ष आहे. आय.सी.एम.एस महाविद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. ही प्रकिया शनिवार, दि.२९ जून, २०२४ पासून बुधवार, दि.३ जुलै, २०२४ पर्यंत चालणार आहे. याचा लाभ बारावी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी घेण्याचे आवाहन केले आहे. या कालावधीत प्रमाणपत्रांची पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. बी.सी.ए. या अभ्यासक्रमासाठी सीईटीची ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया व प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी कॅम्पस प्रमुख डॉ. जयश्री भोसले (मोबा.क्र.७७६८००८९८८),श्री. राजकुमार वाघमारे (मोबा.क्र.९७३०० ७१३११),प्रा.एम.व्ही.चौगुले (मोबा.क्र.९९६०३९३८३६) व प्रा.सौ.के.एस.नलवडे (मोबा.क्र.७८ २१८५७१७३) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. ए.एस.माने यांनी केले आहे. संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या फॅसिलिटेशन सेंटरमध्ये यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

# संविधान साक्षरता हेच बार्टीचे ध्येय आहे: डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज** समता न्याय बंधुता स्वतंत्र्याचा संविधानिक विचार जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेमार्फत संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखी सोहळ्यात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संविधान दिंडीचे आयोजन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

दिनांक २९ जुन रोजी आळंदी येथे संविधान दिंडीचे उद्धघाटन बार्टी संस्थेचे विस्तार व सेवा आयबीपीएस विभागाचे विभाग प्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.उद्धघाटक म्हणून बोलताना विभाग प्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण म्हणाले की , बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान दिंडीचे आयोजन करण्यात आले असुन संविधानाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आळंदी ते पंढरपूर पर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम , प्रबोधनात्मक कार्यक्रमाद्वारे संविधानाचे महत्व बहुजन समाज आणि वारकरी बांधवाना कळावे. डॉ बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने या देशाचे संविधान लिहून या देशातील जनतेला न्याय दिला. संविधान हाच या देशाचा राष्ट्रीय ग्रंथ असून

बहुजनांच्या प्रत्येक समस्येचे निराकरण भारतीय संविधान करते यासाठी संविधान साक्षरता करणे हेच दिंडीमध्ये बार्टीचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे असे मत विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी बोलताना व्यक्त केले.डॉ चव्हाण यांच्या हस्ते वारकरी बांधव, विद्यार्थी व नागरिकांना भारतीय राज्यघटनेची प्रत



व उद्देशिका भेट देऊन सन्मानित करण्यात आले.प्रकल्प व्यवस्थापक श्री सुमेध थोरात यांनी संविधान जनजागृती कार्यक्रमाद्वारे संविधानाचे महत्व विशद केले.

याप्रसंगी प्रकल्प व्यवस्थापक नितिन सहारे, सुमेध थोरात, महेश गवई, डॉ अंकुश गायकवाड, श्रीमती सुनंदा गायकवाड, जागृती गायकवाड, तेजस्विनी सोनवणे, उषा भिंगारे, शितल बडगर, सचिन नांदेडकर, युनुस तडवी, आकाश कु-हाडे,राहुल कवडे , समतादुत यांच्यासह वारकरी बांधव, विद्यार्थी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.सुत्रसंचलन प्रकाशन विभागाचे रामदास लोखंडे यांनी केले.आभार प्रकल्प व्यवस्थापक नितिन सहारे यांनी मानले.

# महाप्रसादाची सेवेमुळे देशभरात श्रीक्षेत्र अक्कलकोटचे नांव पोहचले : पै.चंद्रहार पाटील



**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेली महाप्रसादाची सेवेमुळे देशभरात श्रीक्षेत्र अक्कलकोटचे नांव पोहचले असल्याचे मनोगत दुहेरी महाराष्ट्र केसरी पै.चंद्रहार पाटील यांनी व्यक्त केले.ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरेयांच्या उपस्थितीत विश्र्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी माजी नगरसेवक पै.सद्दाम शेरीकर, सर्फराज शेख यांच्यासह न्यासाचे विश्र्वस्त संतोष भोसले, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, बाळासाहेब पोळ, बाळासाहेब घाडगे, कल्याण देशमुख, शावरप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुर, गोटू माने, निखील पाटील, प्रविण घाटगे, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# ‘पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी’ या आळंदी ते पंढरपूर वारीचा शुभारंभ

## पर्यावरण वारीच्या माध्यमातून समाजात पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण होईल : डॉ.अविनाश ढाकणे

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आषाढी पालखी सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित ‘पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी’ हा एक उत्कृष्ट उपक्रम असून याच्या माध्यमातून समाजात पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ.अविनाश ढाकणे यांनी केले. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आणि महाराष्ट्र कला संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ’पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी’ या आळंदी ते पंढरपूर पायी वारीच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते. लोककला अभ्यासक डॉ.प्रकाश खांडगे, पालखी पदाधिकारी बाबा होनमाने, जयंत चतुर यावेळी उपस्थित होते.श्री.ढाकणे म्हणाले, प्रत्येकाने पर्यावरण संवर्धनासाठी पर्यावरणपूरक जीवनशैली अंगिकारणे आवश्यक आहे.या वारी दरम्यान शक्य तेथे मोकळ्या जागेत वृक्षारोपण करण्यात येऊन वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करावा आणि खरेदीला जाताना नेहमी कापडी पिशवी सोबत ठेवण्याचा सर्वांनी संकल्प करावा, असे आवाहनही श्री.ढाकणे यांनी केले.

**पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी उपक्रमाची संकल्पना**

पर्यावरणाचे प्रश्न हे व्यापक असल्याने वारीत सहभागी होणाऱ्या दहा लाख वारकऱ्यांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृतीसाठी गेल्या चौदा वर्षापासून ’पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी’ हा अभिनव उपक्रम सुरू आहे. याद्वारे पर्यावरण संरक्षण व संवर्धनात लोकजागृतीचे पुढचे पाऊल टाकले जात आहे. वारीत सहभागी होणाऱ्या ग्रामीण जनतेला लोककला प्रकार हा अत्यंत जवळचा असल्याने या माध्यमातून लोकजागृती करण्यात येत असून हा उपक्रम यशस्वी होत आहे. या पायी वारीत मुक्कामाच्या ठिकाणी लोककला प्रकारांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. या उपक्रमात राज्य शासनाने घेतलेल्या एकल वापराचे प्लास्टिक बंदी बाबत व्यापक जनजागृती, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि कापडी पिशव्यांचा जास्तीत जास्त वापर करणे, विजेची बचत, पाण्याचा अतिरिक्त वापर टाळून पाण्याचे नियोजन, वृक्षतोड टाळणे आणि बांबू लागवडीबाबत संदेश देण्यात येणार आहे.

# केंद्रीयमंत्री प्रतापरावांच्या स्वागताने दुमदुमली बुलढाणा नगरी

## विकासाची कास धरून करू सोबतीने मार्गक्रमण : ना.जाधव

**दैनिक यशसिध्दि न्यूज**






बुलढाणा/राहुल साबळे :प्रतापगड स्वागत कमानीवर क्रेन अन् जेसीबीच्या साह्याने गुलाब पाकळ्यांनी उधळण करत केंद्रीयमंत्री बनल्यावर पहिल्यांदा जिल्हा मुख्यालयी आलेल्या प्रतापराव जाधव यांचे दिमाखात झालेले स्वागत, ग्रामदेवता जगदंबेची महापूजा, कारंजा चौकात भारतमाता पूजन जयस्तंभ चौकात स्वागताचा अभूतपूर्व जल्लोष, शिवस्मारकावर महाराजांची महाआरती.. ठिकठिकाणी मंत्री महोदयांचे उस्फूर्त स्वागत होत–होत ओंकार लॉनवर पोहोचताच पोलीस बँड पथकाने जयोस्तुते.. या मंगल गीताने दिलेली सलामी, नंतर झालेला अभुतपूर्व नागरी सत्कार.. अशा क्रमाने केंद्रीय मंत्री प्रतापरावांच्या स्वागताने बुलढाणा नगरी दुमदुमून गेली होती. अपेक्षा न ठेवता राजकारणात आलो, अपेक्षेपेक्षा खूप मिळाले. आता केंद्रात राज्यमंत्री मिळाल्यावर बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाची कास धरून सोबतीने मार्गक्रमण करू, अशा भावना सत्काराला उत्तर देताना ना. जाधव यांनी व्यक्त केल्या.

केंद्रीय राज्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर नामदार प्रतापदावर यांचे रविवार दिनांक ३० जून रोजी आगमन झाले असता, बुलढाणा नागरी सत्कार समितीच्या वतीने त्यांच्या भव्य सत्कार आयोजित केला होता. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आमदार संजय गायकवाड तर बुलढाणा अर्बनचे राधेश्यश्याम चांडक उपाख्य भाईजी, बारोमासकार प्रा. डॉ. सदानंद देशमुख यांच्याहस्ते मुख्य सत्कार संपन्न झाला. यावेळी मंचावर आ. डॉ. राजेंद्र शिंगणे, आ. धीरज लिंगाडे, माजी आमदार विजयराज शिंदे, धृपदराव सावळे, हर्षवर्धन सपकाळ व डॉ. शशिकांत खेडेकर यांचेसह ज्येष्ठ नेते गोकुळ शर्मा व मुक्यत्यारसिंग राजपूत, माजी नगराध्यक्ष पूजाताई गायकवाड, युवासेनेचे नेते मृत्युंजय गायकवाड, शिवसेना जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत व शांताराम दाणे, भाजप नेते योगेंद्र गोडे तथा सत्कार समितीचे अध्यक्ष राजेंद्र काळे यांची उपस्थिती होती. आरंभी प्रस्ताविकातून सत्कार सोहळ्याचा आयोजनासाठी भूमिका समितीचे अध्यक्ष राजेंद्र काळे यांनी विषद केली. प्रा. डॉ. सदानंद देशमुख यांनी प्रतापरावांचे कृषी संस्कृतीशी जुळलेली नाळ सांगितली. प्रतापरावांचे स्वागत करत मलकापूर ते सोलापूर रेल्वे मार्गाची मागणी आ. धीरज लिंगाडे यांनी केली. गोकुळ शर्मा यांनी प्रतापरावांच्या गत आठवणींना उजाळा देऊन भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. राधेश्यश्याम चांडक यांनी प्रथम प्रतापरावांचे स्वागत करत शिक्षण क्षेत्राची दुरावस्था नमूद करून जागतिक कीर्तीचे लोणार सरोवर व ऐतिहासिक ठेवा सिंदखेडराजा या पर्यटन स्थळाच्या भरभराटीची अपेक्षा व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगतात आ. संजय गायकवाड यांनी प्रतापरावांच्या विजयाची परंपरा सांगून जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांच्या माध्यमातून व राज्य सरकारच्या प्रयत्नातून होत असलेल्या जनविकास कामांना आता अधिकाधिक गती प्राप्त होईल, हा ठाम विश्र्वास व्यक्त करत असतानाच बुलढाणा शहर व मतदार संघात चालू असलेल्या कामांची माहिती देत प्रतापरावांचा हा नागरी सत्कार बुलढाणेकरांसाठी आनंदाची पर्वणी असल्याचे सांगितले.

ना. प्रतापराव जाधव यांनी सत्काराला उत्तर देताना पुढे सांगितले की, बाळासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन जेव्हा शिवसेनेत काम सुरू केले तेव्हा शिवसेना सत्तेत येईल, असा विचारही केला नव्हता. ८० टक्के समाजकारण शिवसेनेचे मूळ सूत्र, त्यामुळे आमदार–खासदार– मंत्री होऊ.. असं स्वप्नातही वाटत नव्हते, अपेक्षा नव्हती पण काम करत होतो. आधी आमदार म्हणून, पुढे मंत्री, खासदार व आता केंद्रीय मंत्री जनहिताच्याच कामाला प्राधान्य दिले. अटलजींच्या स्वप्नातील नदीजोड प्रकल्प बुलढाणा जिल्ह्यात पैनगंगा– नळगंगा ते पैनगंगा आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. तो प्रकल्प आलातर शेतकरी संपन्न होईल. भक्ती मार्गाला विरोध आहे, हे ठीक असलेतरी मात्र कोणताही विकास पाहिजे असल्यास अंत:करण उदार ठेवण्याची भूमिका हवी. सिंदखेडराजा व लोणार विकास आराखड्यातील उर्वरित निधी खेचून आणू, आयुर्वेद रुग्णालय जिल्ह्यात येत आहे. खूप संकल्पना आहे, त्यामुळे विकासाची कास धरून सोबतीने मार्गक्रमण करू.. अशी भूमिका प्रतापरावांनी व्यक्त करत या नागरी सत्कार सोहळ्यात जिव्हाळा असल्यामुळे तो अभूतपूर्व झाला, अशी कौतुकाची थाप त्यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जया भारती चंद्रशेखर जोशी यांनी केले. नंतर सत्कार समितीचे वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले, प्रमुख मान्यवरांचे सत्कार डॉ. गजानन पडघान, डॉ. राजेश्र्वर उबरहंडे, निलेश भुतडा, श्रीकांत गायकवाड, पृथ्वीराज गायकवाड, अरविंद होंडे, मंदार बाहेकर, मोहन पऱ्हाड, प्रा.अनिल रिंढे, प्रा. अमोल वानखडे, गुलाबराव कडाळे, डॉ. दुर्गासिंग जाधव, प्रा. सुनील जवंजाळ, डॉ. गायत्री सावजी, सौ. स्मिता चेकटकर, सौ. वैशाली ठाकरे, सिद्धार्थ शर्मा, सुनील देशमुख तुषार सावजी, युवराज वाघ, मोहन पवार, अरुण जैन, नितीन शिरसाट आदींनी केले नागरी सत्कार समितीच्या वतीने मंत्री महोदयांना दिलेली बैलगाडी भेट लक्षवेधी ठरली. कार्यक्रमाची सुरुवात क्षितिज निकम व ज्ञानदा काळे यांच्या योगने झाली. मानपत्र प्रदान करून घेताना त्यांच्या ऑडिओ अनेकांच्या मनाचा ठाव घेऊन गेला. नंतर विविध संस्था व संघटना तथा नागरिकांच्या वतीने प्रतापरावांचा सत्कार तासभर चालला. अगदी व्यवस्थित, नियोजनबद्ध हा नागरी सत्कार सोहळा ठरला, तो बुलढाणा शहरासाठी अभूतपूर्व तेवढाच जिल्ह्यासाठी पथदर्शक !

# शहिद कैलास भारत पवार यांचे शहिद स्मारक उद्घघाटनाच्या प्रतीक्षेत

**चिखली/दैनिक यशसिध्दि न्यूज**




अत्यन्त गरीबी व हालाकीच्या परिस्थितीत मोल मजुरी करून मुलांना घडवीत एक मुलगा देश सेवे साठी अर्पण करणारे ते वीर माता पिता आपल्या शहिद मुलाचे स्मारक कधी होईल वाट पाहुण आहेत मात्र सर्वच सत्ताधारी व विरोधी राजकीय लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांनी या शहिद स्मारकाकडे पाठ फिरविलेली दिसते.

भारत चीन ची सरहद सियाचिन येथे भारतीय सैन्यात कर्तव्यावर असतांना शहिद कैलास भारत पवार यांना वीर मरण आले. त्यांचा अंत्यविधी चिखली शहरातील तालुका क्रीडा संकुल येथे पार पडला

यावेळी लाखो देशभक्तांनी त्यांना शेवटची आदरांजली श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी अनेक राजकीय सत्तारुढ नेत्यांनी विविध आश्र्वसणे दिली परंतु आज रोजी शहिद स्मारक उदघाट्न च्या प्रतीक्षेत आहे. लोकप्रतिनिधीनीं तात्काळ लक्ष देण गरजेचं आहे. या कामात हि राजकारण असल्याची चर्चा शहरात सुरु आहे संबंधित विभागाने स्मारकचे काम तात्काळ सुरु करून स्मारकचे उदघाट्न करावे अन्यथा सामान्य नागरिक वीर सैनिकांच्या स्मारक साठी रस्त्यावर उतरतील यात शंका नाही.

# खाल्या खस्ता... अखेर उद्योजक राजू खरे यांनी बनवला स्वखर्चातून रस्ता

## सरपंच विश्वास महाडिक यांचे पुढाकारातून कामात सुरुवात

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**



लोकप्रतिनिधी कडे वेळोवेळी मागणी करूनही निधी उपलब्ध होत नसल्याने पंढरपूर तालुक्यातील पळून या ठिकाणी कारंडे वस्ती ते वाघमोडे वस्ती दरम्यान असणारा रस्ता दुर्लक्षित राहिल्याने याबाबत देखील रहिवाशांनी चाळीस वर्ष कष्ट खाल्ल्या अखेर मोहोळ विधानसभा मतदारसंघात इच्छुक असणारे संभाव्य उमेदवार उद्योजक राजाभाऊ खरे यांच्याकडे याबाबत गाराने मांडल्यानंतर त्यांनी स्वखर्चातून हा रस्ता गावचे सरपंच विश्र्वास महाडिक यांच्या पुढाकारातून बनवण्यात सुरुवात केल्याने रहिवाशातून समाधान व्यक्त होत आहे

पंढरपूर तालुक्यातील पुळुज या गावात कारण ते वस्ती ते वाघमोडे वस्तीसाठी रस्ता व्हावा याकरिता गेले ४० वर्ष नागरी फोडा पुढाऱ्यांकडे मंत्र्यांकडे घालून साखळी घालत होते परंतु येथील नागरिकांच्या समस्या कोणीही जाणल्या नाहीत आणि रस्ताही झाला नाही पावसाळ्यात रस्त्या अभावी कच्च्या रस्त्याने चिखलातून पाण्यातून वस्तीवर राहणाऱ्या नागरिकांना शालेय विद्यार्थ्यांना विद्यालयात जाण्यासाठी जीवघेणा प्रवास करावा. पावसाळ्यात रस्त्यात वर चिखल राहिल्यास ग्रामस्थांना बाहेरगावी जाण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी जाण्यासाठी वस्तीतून बाहेर पडता येत नव्हते याबाबत येथील नागरिकांनी कोणीही दखल घेतली नाही या रोडवर थोडा जरी पाऊस पडला तरी नागरिकांना जाता येत नाही या भागात दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणात होत आहे लेण्या जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे काही मुलांची लग्न सुद्धा मोडले आहेत याबाबत वस्तीवरील नागरिक सरपंच विश्र्वासराव महाडिक यांच्याकडे गेले व आम्हाला रोड करून द्या व त्यांनी लगेच सांगितले उद्योजक राजीव खरे यांच्याकडे सर्व जावा आणि त्यांना भेटा सर्व नागरिक उद्योजक अजूकऱ्यांना भेटले व त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता लगेचच मुरमीकरण कामास सो करताना सुरुवात केली आणि अनेक पिढ्यापासून असलेली शेतीची व स्वतःची परफेक्ट त्या जमा केली व मुळातच बागायती सुपीक जमीन पावसामुळे चिखलमय होत असेल चालत जाणेही यावं आवश्यक असताना वाहने कशी जाणार यामुळे कित्येक वर्षे या परिसरातील शेतमाल व शेतकऱ्यांच्या घरी पोहोचताना नाकी नऊ होत होते व पावसाळ्यात कित्येक वेळा पिकाची लाखो रुपये नुकसान शेतकरी सहन करत होते व स्वतःच्या खिशातून भरे व आर्थिक मदत राजू खरे यांनी केले आहे वाघमोडे वस्ती व रोड ज्या कामास दिमाखात सुरुवात झाल्यामुळे नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे सरपंच विश्र्वासराव महाडिक उपसरपंच असिफ शेख यांनी स्वतः उपस्थित राहून कामाची देखरेख केली

# ‘ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती येथे व्हॅन हॉल लॉरेनस्टाईन विद्यापीठ, नेदरलँड यांचे तज्ज्ञांमार्फत स्मार्टच्या अधिकाऱ्यांनी घेतले मूल्य साखळी विकासाचे धडे’

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बारामती/प्रतिनिधी : ‘ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती, व्हॅन हॉल लॉरेनस्टाईन विद्यापीठ, नेदरलँड आणि मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट पुणे विभाग कार्यालय) संस्थेमध्ये मूल्य साखळी विकास क्षमता बांधणी कार्यक्रम राबविणेच्या झालेल्या करारानुसार दि.२५ ते २७ जून दरम्यान महाराष्ट्रातील स्मार्टच्या एकूण २१ अधिकाऱ्यांनी फळे व भाजीपाला मूल्यसाखळी व्यवस्थापन याविषयी प्रशिक्षण घेतले.

राज्यात मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) हा जागतिक बँक अर्थसहाय्यित प्रकल्प मुख्यतः कृषी विभाग आणि अन्य संलग्न विभागांमार्फत राबविण्यात येत आहे. या प्रकल्प व कराराअंतर्गत समुदाय आधारित संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्यांना केंद्रस्थानी ठेवून फळे व भाजीपाला मूल्य साखळी विकास याच्याशी निगडित विविध विषयांवर प्रशिक्षण घेण्यात आले. या अधिकाऱ्यांना कौशल्य आधारित प्रशिक्षण देण्यासाठी ‘व्हॅन हॉल लॉरेनस्टाईन विद्यापीठ’, नेदरलँडस् येथील श्रीमती एंजेली बेनेन व श्री. डॅनियल मॅगवेगवे यांनी प्रशिक्षण दिले तसेच भाजीपाला गुणवत्ता केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथील तज्ञ मार्गदर्शक उपलब्ध होते. या प्रशिक्षणामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतीमाल काढल्यानंतर ते विक्रीपर्यंतच्या विविध टप्प्यांवर ज्या काही अडचणी येत आहेत त्या अडचणींवर परदेशातील उपलब्ध तंत्रज्ञानानुसार कशाप्रकारे मात करता येईल यावर माहिती देण्यात आली.या प्रशिक्षणाच्या यशस्वी नियोजनाकरिता डॉ. हेमंत वसेकर, प्रकल्प संचालक, स्मार्ट पुणे, ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. निलेश नलावडे व अटल इनक्युबेशन सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. जया तिवारी यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षणा दरम्यान ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन श्री राजेंद्र पवार साहेब यांनी भेट देऊन अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.




प्रकल्प समन्वयक श्री. यशवंत जगदाळे म्हणाले या करारानुसार यापुढे हे २१ अधिकारी तज्ञ प्रशिक्षक तयार होणार आहेत. या तज्ज्ञांना ऑक्टोबर २०२४ दरम्यान नेदरलँड येथे तीन आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानंतरच्या कालावधीमध्ये हे तज्ञ प्रशिक्षक स्मार्ट प्रकल्पातील समुदाय आधारित संस्थांमधील ८०० शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत.